देशोन्नती

# अनोळखी युवतीच्या खुनाला फुटली वाचा; आरोपी जेरबंद

औंढा ना. तालुक्यातील नागेशवाडी शिवारात आढळलेल्या अनोळखी महिलेच्या खुनाचा छडा अवघ्या पाच दिवसात पोलिसांनी लावून गुन्ह्यातील आरोपीला आंधप्रदेशातून अटक केली.

## 'लिव्ह इन रिलेशनशिप' मधून घडली खुनाची घटना

- स्थानिक गुन्हे शाखा व औंढा नागनाथ पोलिसांची कामगिरी
- डी मार्ट बिलावरून अनोळखी मृतदेहाची पटली ओळख
- खून करणाऱ्या आरोपीला आंध्र प्रदेशातील आदिलाबाद येथून केले अटक
- डी मार्ट बिलावरून अनोळखी मृतदेहाची पटली ओळख

देशोन्नती वृत्तसंकलन

हिंगोली/औंढा नागनाथः औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात एका अनोळखी तरूणीचा मृतदेह आढळून आला होता. सदर प्रकरणात तिचा गळा दाबून खून केल्याचे निष्पन्न झाल्याने खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. अनोळखी युवतीची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे टाकले असताना सुतावरून स्वर्ग गाठीत पोलिसांनी या खुनाचा छडा लावून आरोपीला जेरबंद केले.

याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिलेली माहिती अशी की, २४ डिसेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात मसोबा मंदिराच्या पाठीमागे जंगल परिसरात २५ ते ३० वर्षीय वयोगटातील अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला. या मृतदेहाच्या अंगावर जखमा व तोंडून रक्त आल्याचे दिसून आल्याने हा खुनाचा प्रकार असावा, अशी शक्यता वर्तविली. त्या दृष्टीने हा गुन्हा उघड करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा व औंढा नागनाथ पोलिसांना सूचना दिल्या होत्या. यासाठी गुन्हे शाखेचे तीन व औंढा नागनाथ ठाण्याचे दोन असे एकूण पाच वेगवेगळे पथक करून तपास संमातर पद्धतीने करण्यातआला. या



पथकाने घटनास्थळावरील पुरावे व सायबर तंत्रज्ञानाची मदत घेऊन बारकाईने अभ्यास केला. मृतदेहापासून काही अंतरावर एक बॅग मिळून आली. त्यामध्ये डीमार्टचे बील आढळून आले. त्यावरून पथकाने तपास सुरू केला असता अलका बाजीराव बेंद्रे (२९) रा. सदाफुले वस्ती जामखेड जि. अहिल्यानगर (अहमदनगर) ही असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून पथकाने अधिक माहिती घेतली असता अलकाचे श्रीकांत सुरेश पिनलवार रा. मुघट ता. मुदखेड जि. नांदेड याच्यासोबत मागील नऊ महिन्यापासून 'लिव्ह इन रिलेशनशिप' मधून प्रेमसंबंध असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून त्यांच्यात अधुनमधून वाद सुरू होता. श्रीकांतने छत्रपती संभाजीनगर येथील लाडगाव येथे किरायाच्या घरात २३ डिसेंबरला मध्यरात्री अलकाचा गळा दाबून खून केल्यानंतर तिचा मृतदेह नष्ट करण्याच्या उद्देशाने बॅगमध्ये मृतदेह टाकून जालना येथे जाण्याचे नियोजन केले होते. त्याला एक खासगी वाहन औंढा नागनाथ पर्यंत जात असल्याचे कळल्यावरून त्याने जालना येथे न थांबता औंढा नागनाथ येथे आला. बसस्थानकावर उतरल्या नंतर बॅगसह मृतदेह घेऊन मसोबा मंदिराच्या पाठीमागे हा मृतदेह फेकून तो आंधप्रदेशातील आदिलाबाद येथे आपल्या नातेवाईकाकडे निघून गेला. या खुनाचा उलगडा झाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला आदिलाबाद येथून ताब्यात घेतले. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय पोलीस अधिकारी आंबादास भुसारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास पाटील, औंढा ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणपत राहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व औंढा ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेकडे, गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस उपनिरीक्षक विक्रम विठूबोणे, माधव जिवारे, कपिल आगलावे यांच्यासह पांडूरंग राठोड, कोंडीबा मगरे, विक्रम कुंदनानी, गजानन पोकळे, किशोर कातकडे, निरंजन नलवार, दत्ता नागरे, आकाश टापरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, विठ्ठल काळे, नरेंद्र साळवे, हरीभाऊ गुंजकर, इम्रान सिद्दीकी, एकबाल शेख, मदार शेख यांनी केली आहे.

### दोन्ही पथकाला बक्षिस जाहीर

अनोळखी महिलेच्या खुनाचा छडा लावण्याचे पोलिसांसमोर आव्हान असताना स्थानिक गुन्हे शाखा व औंढा नागनाथ पोलीस ठाण्याच्या पथकाने या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला जेरबंद केल्याने जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दोन्ही पथकाला प्रत्येकी ३५ हजार रूपये असे एकूण ७० हजार रूपयाचे बक्षिस जाहीर केले.

Hingoli Edition
Dec 30, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com

देशोन्नती



हिंगोलीः औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात अनोळखी महिलेच्या खुनाचा छडा लावल्यानंतर आरोपीला जेरबंद केले. यावेळी पत्रकार परिषदेत माहिती देताना पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह पोलीस निरीक्षक विकास पाटील, गणपत राहिरे व तपास पथक

Hingoli Edition
Dec 30, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com